## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
## जिल्हा परिषद यवतमाळ
## दुरध्वनी ०७२३२-२५६७६७
## ई-निवीदा सूचना क्रं०१/२०२२-२०२३

राज्य शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार दिनांक ४/९/२०२० पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णयान्वे मा. मिशन संचालक यांचे पत्र क्रंमाक रापास्वमी/०५२०/प्र.क्र.६२ पापु २५ दिनांक १६/२/२१ च्या पत्रान्वये राज्यात जल जिवन मिशन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे जल जिवन मिशन स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बाहय संस्थेव्दारे मनुष्यबळ घेण्यासाठी ई निविदा मागविण्यात येत आहे.

**अर्टी व शर्ती**

१) ई निविदा फि रुपये ५००/- इसारा रक्कम रुपये २५०००/- ऑनलाईन पध्दतीने स्टेट बॅक ऑफ इंडीया च्या नेट बॅकींग किंवा एन.ई.एफ.टी व्दारे भरणा करावा.सदर बाबी मध्ये सुट असल्यास सक्षम प्राधीकरणाचे प्रमाणपत्र सादर करण्यात यावे ,इतर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२ ) मनुष्यबळ पुरवठा करण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर एफ. डि. आर.१००००/- रुपये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांचे नावाने भरणा करावा लागेल.

३)निविदा स्विकृतीचा कालावधी दिनांक 22/3/22 रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते दिनांक 29/3/22 सायकाळी ५.०० वाजेपर्यत असुन निविदा दिनांक 30/3/22 रोजी सकाळी ११.००वाजता जिल्हा प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प.यवतमाळ यांचे समक्ष उघडण्यात येईल.

४)सदर ई निविदा www.mahatenders.gov.in ,www.zpyavatmal.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**ई निविदा सोबत खालील कागदपत्राच्या सांक्षाकिंत प्रती अपलोड करणे अनिबार्य आहे सा सर्व बाबीची पुर्तता करणारे निविदाधारकाच पात्र राहील.**

१) पॅन कार्ड

२) टॅन कार्ड

३) वस्तु व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र (GSTIN) ,कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठन कार्यालय यांचे नोंदणी प्रमाणपत्र मागील सहा महीन्याचे EPF Challan ECR Statement सोबत जोडणे आवश्यक.

४) राज्य कर्मचारी विमा कार्यालय यांचे नोंदणी प्रमाणपत्र

५) कामगार उपायुक्त कार्यालय यांचेकडील लेबर लाईसेंस

६) व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र

७) आर्थिक वर्ष २०१८-२०१९, २०१९-२० ,२०-२१ चे टर्नओव्हर सर्टीफीकेट.

८) शासकीय/निमशासकीय कार्यालयात तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा केल्याचे आदेश काम समाधानकारक असल्याचे अनुभव प्रमाणपत्र.

९) shop act registration नोंदणी प्रमाणपत्र.

ज्या बाहय संस्थेला काम मंजुर करण्यात आलेले आहे त्यांनी आदेश देण्यापुर्वी त्यांचेकडुन ५०० रुपये रक्कमेच्या बॉन्ड पेपरवर मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ व निश्चीत केलेल्या अटी व शर्तीसह करारनामा करुन दयावा लागेल.

करारनामा कालावधी ३१ मार्च २०२४ पर्यत राहील करारनाम्याचा कालावधी कमी करणे किंवा जास्त करणे मुदतवाढ देणे या बाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ जि.प.यवताळ यांना राहतील.

**मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहय यंत्रणेची निवड**

मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणेस यवतमाळ जिल्हयातील कामाचा किंवा शासकीय कार्यालयात कोणत्यांही तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करण्याचा अनुभव असला पाहीजे.